# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

## Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

दूरध्वनी क्रमांक: ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
ईमेल/ Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
संकेतस्थळ/Website: www.unipune.ac.in


**परिपत्रक क्र. ७७/ २०२५**

**विषय :** श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासातर्फे आर्थिक गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी सुरू असलेल्या पुस्तकपेढी योजनेसंदर्भात अवगत करण्याबाबत..

**संदर्भ :** श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई ४०००२८ यांचे पत्र क्र. सिविगम/६२/२०२५ दि. १५/०२/२०२५

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, मुंबई यांचे प्राप्त पत्रान्वये आर्थिकदृष्ट्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी न्यासातर्फे श्रीसिध्दिविनायक पुस्तकपेढी योजना योजना इयत्ता 11 वी ते पदवी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके मोफत उपलब्ध करून देण्यासाठी अर्ज करण्याबाबत कळविले आहे.

सोबत प्राप्त पत्र जोडले आहे, पत्रातील आशय स्वयंस्पष्ट असून त्याप्रमाणे आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना अवगत करावे.

गणेशखिंड, पुणे ४११००७ )
संदर्भ: शै.प्रवेश/ ७६१ )
दिनांक: २५/०३/२०२५ )

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-**
मा. प्राचार्य/संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये/परिसंस्था.

D:\General Circulars\General Circulars.docx

# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास

(महाराष्ट्र शासन नियंत्रित)

एस.के.बोले मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२८

दुरध्वनी : ०२२-२४२२४४३८ । २४२२१५५८

ईमेल : admin@siddhivinayak.org । info@siddhivinayak.org

वेब : www.siddhivinayak.org


श्रीसिध्दिविनायक

संदर्भ क्र. सिविगमं / 62 / २०२५ दि. १५ फेब्रुवारी २०२५


मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 20 FEB 2025
आवक क्रमांक 948
जावक दिनांक 21 FEB 2025

कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
21 FEB 2025
आवक क्रमांक:पीव्हीसी/ 486
जावक दिनांक: 21-2-25
विभाग: PGS

Ph.D./M.Phil Unit
Inward No. 1123
Date: 21/02/25


प्रति,

कुलगुरू,

सावित्रीबाई फुले विद्यापीठ

पुणे.

**विषय : श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासातर्फे आर्थिकदृष्ट्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी सुरु असलेल्या पुस्तकपेढी योजनेसंदर्भात अवगत करण्याबाबत.**

महोदय / महोदया,

आर्थिकदृष्ट्या गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी न्यासातर्फे श्रीसिद्धिविनायक पुस्तकपेढी योजना सन २००५ पासून सुरु करण्यात आली आहे. यामध्ये इयत्ता ११ वी ते १५ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना क्रमिक पुस्तके मोफत उपलब्ध करून देण्यात येतात. सदर योजना माहे जून ते सप्टेंबर या कालावधीत राबविण्यात येते.

खालीत निकषांची पुर्तता करून महाविद्यालयांकडून अर्ज सादर करण्यात येतात.

| अ.क्र. | संस्थांसाठीचे निकष |
|---|---|
| १ | शैक्षणिक संस्था ही सामाजिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम सन १८६० (सन १८६० चा अधिनियम २१) / सन १९५० (सन १९५० चा मुंबई अधिनियम २९) अंतर्गत नोंदणीकृत असणे असल्याबाबतची प्रत |
| २ | संस्थेचे उद्दिष्ट शैक्षणिक असणे आवश्यक राहील. त्यासाठी संस्थेच्या बायलॉज (उपविधी) प्रत जोडावी. |
| ३ | संस्थेकडून प्रस्तापित / नियंत्रितशाळा/ महाविद्यालय हे शासनमान्य (इयत्ता व शाखा याचा उल्लेख असावा) असावे. यापृष्ट्यार्थ शासनमान्यता / शासननिर्णय याची प्रत जोडणे आवश्यक राहील. |
| ४ | वाचनालय असलेल्या शाळा / महाविद्यालय यांना प्राधान्य देण्यात येईल. |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांची शैक्षणिक शाखा निहाय व इयत्ता निहाय यादी (कला, वाणिज्य, विज्ञान, ११ वी ते १५ वी ) प्राचार्यांनी प्रमाणित करून प्रस्तावासोबत पाठवणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थांचे नाव केशरी शिधापत्रिकेत समाविष्ट असले पाहिजे. |
| ६ | विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील व गरजू असल्याबाबत प्राचार्यांनी / मुख्याधापक यांचेकडून खातरजमा करून तसेच प्रमाणपत्र स्वत:च्या स्वाक्षरीने देणे बंधनकारक असेल. अन्यथा पुस्तकपेढी योजनेतून पुस्तके वितरीत केली जाणार नाहीत तसेच विद्यार्थांचे नाव केशरी शिधापत्रिकेत समाविष्ट असले पाहिजे. |
| ७ | मुख्याध्यापक / प्राचार्यांनी प्रमाणपत्रावर केलेल्या स्वाक्षरीची पडताळणी करण्यासाठी त्यांनी स्वत:च्या पॅन कार्डची व ओळखपत्राची छायांकित प्रत स्वयं साक्षांकित करून पाठवावी. |
| ८ | संस्थेकडून प्रस्तापित / नियंत्रितशाळा/ महाविद्यालयाच्या सादर केलेल्या प्रस्तावाच्या मागणी पत्रावर Udise क्रमांक असणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| ९ | संस्थेला एकदा पुस्तके दिल्यानंतर अभ्यासक्रम बदल्याखेरीज पुढील ३ वर्षे पुस्तके वितरीत केली जाणार नाहीत. तसेच दर वर्षी वार्षिक परीक्षा संपल्यानंतर दि. १० जून पुर्वी विद्यार्थ्यांकडून परत घेतलेल्या पुस्तकांचा इयत्ता निहाय व शाखा निहाय, गोषवारा संबधित संस्थेने / महविद्यालयाने न्यासास पाठविणे बंधनकारक आहे. |
| १० | प्राचार्य / मुख्याध्यापकांनी शाखा निहाय व इयत्ता निहाय आवश्यक असलेल्या पुस्तकांची लेखकाच्या नावासहित यादी सादर करून पुस्तकांची मागणी करावी. सदर यादी तपासून पुस्तकांचे वितरण न्यासाकडून केले जाईल. |
| ११ | ज्या महाविद्यालयांना न्यासाकडून पुस्तके पुरविण्यात आली आहेत त्यांच्या पुस्तकांचे व अभिलेखांची न्यासाकडून संस्थेला भेट देऊन तपासणी करण्यात येऊ शकेल. |
| १२ | प्रस्तावा सोबत श्री सिद्धीविनायक गणपती मंदिर न्यास या नावे रु. ५,०००/- धनादेश / डी.डी. अथवा न्यासाच्या खात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करून त्याची पावती प्रस्तावासोबत जोडण्यात यावी. सदर अनामत रक्कम विनापरतावा स्वरुपाची असेल. प्रस्ताव मान्य झाल्यानंतर अनामत रक्कमेची पावती देण्यात येईल. |
| १३ | संस्थेकडून / महाविद्यालयची माहिती INDEMNITY BOND मुद्रण शुल्क रु. ५००/- च्या नोटरीसह करून घ्यावे व मूळ प्रत न्यासास सादर करावी (टीप : INDEMNITY BOND चा मसुदा श्री सिद्धिविनायक मंदिर पुस्तकपेढी विभागात उपलब्ध आहे.) |
| १४ | प्रत्येक विद्यार्थ्याचा स्वतंत्र अर्ज भरण्यात यावा. अर्ज व त्यासोबत आधार कार्ड, केशरी शिधापत्रकाची प्रत, पुढील वर्गात प्रवेश घेतल्याची फी पावती या कागदपत्रांची प्रत सोबत जोडण्यात यावी. प्रत्येक अर्ज प्राचार्य / मुख्याधापक यांचेकडून सही व शिक्का सहीत सादर करावा. |
| १५ | महाविद्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावाच्या प्रत्येक पानावर प्राचार्यांची सही व महाविद्यालयाचा शिक्का असणे अनिवार्य आहे. त्याशिवाय प्रस्ताव मान्य केला जाणार नाही. |
| १६ | ज्या संस्थाना / महाविद्यालयांना न्यासाकडून पुस्तके पुरविण्यात आली आहेत. त्यांच्या पुस्तकांचे व अभिलेखांची न्यासाकडून संस्थेला / महाविद्यालयांना भेट देऊन तपासणी करण्यांत येईल. |
| १७ | संस्थाना / महाविद्यालयांना श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाकडून मंजूर झालेल्या प्रस्तावास इयत्ता १३ वी ते १५ वी (कला, वाणिज्य व शास्त्र शाखा) केवळ क्रमिक पुस्तके श्रीसिद्धिविनायक मंदिर पुस्तकपेढी योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतील. |
| १८ | संस्था व महाविद्यालयाचे अर्ज १ जून ते ३० सप्टेंबर या कालावधीत स्वीकारले जातील. दि. ३० सप्टेंबर नंतर संस्थेकडून / महाविद्यालय यांचेकडून पुस्तके मिळण्यासाठी पाठविण्यात आलेले प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाहीत. |
| १९ | प्रत्येक संस्थेला / महाविद्यालयाला कनिष्ठ व वरिष्ठ या दोन्ही विभागांची मिळून पुस्तकांची मर्यादा २०० संचाची राहील. |

तरी आपल्या विद्यापीठाशी संलग्न असण्याऱ्या महाविद्यालय, संस्थाना श्रीसिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासातर्फे राबविण्यात येण्याऱ्या पुस्तकपेढी योजनेबाबत अवगत करावे. जेणेकरून श्रीसिद्धिविनायक पुस्तकपेढी योजनेचा लाभ महाराष्ट्रातील सर्व भागात पोहोचण्यास मदत होईल.

आपली स्नेहांकित,

Vpatil

(वीणा पाटील)
कार्यकारी अधिकारी